# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**प्रा. जया यशवंत बाविस्कर** सहाय्यक प्राध्यापिका आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर जि. धूळे

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर विचारवंत होते. ते दलित, शोषित व पीडितांचे कैवारी होते. त्यांनी दलितांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण केली. ते एक क्रांतीकारक महापुरुष होते. त्यांनी खडतर ज्ञानसाधना करुन विधिशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयांमध्ये प्रभुत्व संपादन केले. ते ज्ञानजिज्ञासू, ग्रंथवेडे होते. त्यांनी अनेक शैक्षणिक कार्यक्रम करून समाजशास्यविषयक विचार मांडले. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या चार आधारभूत तत्वांचे ते पुरस्कले होते. त्यांनी गौतमबुद्ध संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना गुरु मानले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले विचार त्यांनी लिहीलेल्या ग्रंथांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविले. त्यातील ठळक ग्रंथ म्हणजे हु वेअर अ शुद्राज, द प्रॉब्लेम ऑफ कॉस्टस्, स्टेटस् ऑफ मायनारिटीज इ. त्यांच्या लेखनातून त्यांचे स्पष्ट विचार त्यांना दलितांविषयी वाटणारा जिव्हाळा तसेच निर्भयता दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे वाटायचे को शिक्षणाद्वारे समाजाची प्रगती व्हावी, विकास व्हावा. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन मानवकल्याणाच्या तत्त्वास अनुसरुन जोवन व्यतीत करणारा समाजं शिक्षणातून निर्माण व्हावा. असे त्यांना अभिप्रेत होते. शिक्षण हे एक शस्त्र आहे. त्यातून समाजातील विषमता नष्ट इ गाली पाहिजे. समाज संघटित झाला पाहिजे. शिक्षणाबाबत समाजात समानता प्रस्थापित झाली पाहिजे. शिस्त निर्माण झाली पाहिजे. शिक्षण हे मूल्याधिष्टीत असले पाहीजे. त्यातून चारित्र्यसंपन्न समाज निर्माण झाला पाहिजे.

**विषमता नष्ट करण्यासाठी शिक्षण :**

शिक्षणाअभावी माणूस म्हणजे केवळ पशू असे त्यांचे मत होते. उपासमारीने विषमता शिक्षणाअभावी माणूस म्हणजे केवळ पशु असे त्यांचे मत होते. उपासमारीने माणूस बलहित होतो. तसेच शिक्षणा अचाक्षी तो निर्वृद्ध साहिल्यास दुसऱ्याचा गुलाम होतो. समाजात अनेक प्रकारच्या विषमता आहेत. जाती, धर्म, पंथ इ. क्षेत्रात विषमता दिसले येते. त्यामुळे जनसामान्यांची सतत पिळवणूक होतांना दिसते. जाती, धर्म, पंथ यातील विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाची कास

**समानतेसाठी शिक्षण :**

समाजात दिवसेंदिवस असमानता दिसत असल्याबद्दल डॉ. आंबेडकरांना खंत वाटत होती. त्यांच्या मते, शिक्षण प्रत्येकाच्या आवाक्यात आणता आले पाहिजे. म्हणून निम्नस्तरीय वगांसाठी शिक्षण जेवढे स्वस्त व सुलभ करता येईल. तेवढे करता आले पाहिजे. तात्कालिन शासनाला त्यांनी मागासवगीय समाजाला आपुलकिची वागणूक देण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते समानता म्हणजे खालच्या वर्गाची पातळी वरच्या वर्गापर्यंत आणणे होय. म्हणुन खालच्या पातळीच्या लोकांना शिक्षण घेण्यासाठो विशेष सवलती उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

**चारित्र्यनिर्मितीसाठी शिक्षण :**

बाबासाहेबांनी शिक्षणाला अन्न व शक्तीची उपमा दिली आहे. "ज्याप्रमाणे मनुष्य प्राण्याला अन्नाची जरूरी असते. त्याचप्रमाणे सर्वांना विद्येची जरुरी आहे." शिक्षण हे व्यक्तीच्या शरीरात भिनले पाहिजे. त्यामुळे त्यांचे मन आणि शरीर सुदृढ राहील. शिक्षणाअभावी व्यक्ती पशुवत होईल. म्हणून व्यक्तीला शिक्षणाची आयुष्यभर गरज असते.

डॉ. आंबेडकरांच्या मते, चारित्र्यामुळे ज्ञान चांगल्या किंवा वाईट कामासाठी वापरावयाचे की नाही हे ठरविता येते. मानवी सभ्यता व संस्कृतीचा खरा पाया म्हणजे शिक्षण होय. सुशिक्षितांकडे चारित्र्याची वाण असेल तर त्यांच्या प्रगतीसाठी आणि वंचित व दुबळ्या घटकांसाठी हितकारक अशा ज्ञानाचा वापर करता येण्याजोगा आहे. डॉ. बाबासाहेबांनी चारित्र्याला उत्तमप्रकारे जपले होते. वंचितांच्या आत्मोन्नतीसाठी त्यांनी आपल्या ज्ञानाचा वापर करुन घेतला होता. व्यक्तिला चरित्र असते पण चारित्र्य असलेच असे नाही. चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण गरजेचे असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.

**मूल्यावर आधारित शिक्षण:**

डॉ. बाबासाहेबांच्या मते, शिक्षण हे मूल्याधिष्ठित असावे. बालकाच्या मनावर शिक्षणाचा प्रभाव योग्यप्रकारे झाला पाहिजे. शिक्षणाने त्याग, मानवता, विनम्रता, नैतिकता यासारखी मूल्य बालमनावर रुजविली पाहिजेत. यामुळे बालकाच्या व्यक्तीमत्वाचा विकास होऊ शकेल. जीवनाला मूल्याची जोड असली पाहिजे. मूल्य शिकविली जात नाहीत ती रुजवावी लागतात. त्यांच्या मते शिक्षण आणि नैतिकता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. नैतिकतेशिवाय शिक्षण असू शकत नाही. असे त्यांचे मत होते.

**शाळा हे एक संस्कार :** एक संस्कार केंद्र गंध प्रकारचे सुनियोजीत संस्कार व्हावेत. म्हणून तर राजांची दुर्बल घटकांना राजा येते. महणूनच त्याचे पावित्र्य राखिवण्याचा करा दियकता आहे. ह्यात शिक्षक हा महत्त्वाचा घटक आहे. वंचित व दुर्बल घटकांनी ह्या व्यवसायाकडे वळाणे पावित्र्य राखण्याची असे त्यांचे मत होते. शिक्षकीपेक्षा हा सहजसाध्य व सोपा आहे. त्यामुळे समाजातल्या दुर्बल घटकांना त्यात आवश्यक आहे, असे त्यांचे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पण त्याचबरोबर शाळा शिक्षकर शाचि

शिक्षण ह्या तिन्ही बाबी किती जबाबदारीच्या आहेत. ह्यांची जाणीवही ते करुन देतात. समाजाचे हित आणि शिक्षण हे परस्परांशी संबंधित आहे. त्यामुळेच बाबासाहेबांना पारंपारिक शिक्षण मान्य नाही. जातीनिष्ट आणि केंद्रीकरणामुहे शिक्षणाचा प्रवाह तुंबला असे त्यांचे मत होते. बाजारासारखांनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाचाही विचार केला. त्यांच्या मते, महाविद्यालयीन किवा विद्यापीठीय शिक्षणाचा प्रभाव चिरकालीन स्वरुपाचा असतो. त्यामुळे विद्यापीठ हा कारकुन काढण्याचा कारखाना ठरु नये. अशी त्यांची अपेक्षा आहे. शिक्षणक्षेत्रातील प्राध्यापक ध्येयवादी असावे असे त्यांना वाटते. प्राध्यापकांकडून बाबासाहेबांच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत.

**प्राथमिक शिक्षणावर भर :** बाबासाहेबांना शिक्षणातील सर्वात खालचा थर अतिशय महत्वाचा वाटतो म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणावर भर दिला. हीच गोष्ट १८८६ च्या शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणात अंतर्भूत केलेली आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांची अवस्था चांगलो नाही. काही शाळांमध्ये पहिली ते चौथी किंवा त्याहूनही जास्त वर्ग एकच शिक्षक घेत असतो. शिक्षकाची आर्थिक, सामाजिक व मानसिक अवस्था समाधानकारक नाही. अशा परिस्थितीत प्राथमिक शिक्षण सुरु आहे. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाची स्थितो सुधारण्यासाठी अनुदानाची किती आवश्यकता आहे हे १९२७ मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्र्यांना पटवून दिल होते. प्राथमिक शिक्षणाने विद्यार्थ्यांत कसा बदल अपेक्षित आहे ते त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत घातले की, त्यांचे शिक्षण लिहीण्यावाचण्याच्या अवस्थेपर्यंतच राहू नये तर संपूर्ण साक्षर होवूनच बाहेर पडावा व पुढील आयुष्यात सुद्धा ज्ञान घेतच असावा. डॉ. बाबासाहेबांचा शिक्षणाच्या व्यापारीकरणाला विरोध होता. समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहीजे आज आणि ते सर्वांना शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या अनुदानाची आखणी झाली पाहिजे असे त्यांचे मत होते.

**स्त्री शिक्षण:** ही गोष्ट पारंपारिक धर्मग्रंथामुळे स्त्रियांची अवस्था दयनीय होती. त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हताः। पारंपरिक धर्मर्यधामळे विद्याची चे गुरु. फुले म्हणतात, "मानवाला बुद्धीचे वरदान आहे. तो पुरावा असीमध्ये कमी जास्त कारो आली. या पुरने से चेतना लिहीलेली आहे, त्यांनी स्वीयांचे नैसर्गिक मानवी हक्क काढून घेतले व खत्रीला गुलाम बनविले. वास्ति रवी पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे, अपत्यप्रेमाचे वरदान निसर्गतः स्वीला मिळाले आहे. याबाबत ती पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे." ये होते. बाबासाहेबांच्या लक्षात चरापर्यंत शिक्षण गेले पाहीजे आणि ते सर्वांना शासनातर्फे दिल्या जाणा पेक्षा श्रेष्ठ आहे. अपनायेगात अनूनी विद्याविषयीचे विचार काहीसे अप्रगतच आहेत जसे पुरुषाचा स्त्रीवरचा तिला जिवंत व्यक्ती न मानता संपत्ती मानणे, कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य न देणे, केवळ उपभोग्य वस्तू मानणे, तिला विचारामधूनच स्त्रीची गुलामी निर्माण झाली. समाजमनात ती रुजली आणि फोफावली. आजही समाजमन या सर्व विचारांमधून बाहेर येऊ शकले नाही. इतकी ती पक्की झाली आहे. स्त्रीवर धर्माच्या नावाने आजही धर्मगुरु अन्याय करीत आहेत. सक्तीचा बुरखा, नोकरी सोडून चार भिंतीच्या आड घरी बसणे, हे न करणाऱ्या स्त्रियांना धार्मिक स्थळी प्रवेशबंदी, त्यांचे कित्येक वांचे विवाह मोडण्याची, मुलांबाळांपासून स्त्रियांची ताटातूट करण्याची धमकी त्यांना देण्यात आली आहे. राज्यघटनेने मिळणाऱ्या कोणत्याही हक्काचा उपभोग या स्त्रियांना घेता येवू नये. अशीच स्थिती आहे. वास्तविक स्त्रियांची प्रतिभा जेवढी फुलेल, त्यांच्या अंतःशक्ती जेवढ्या साकार होतील तेवढे मानवजातीचे कल्याण होणार आहे. समाजाचा अर्धा भाग असणाऱ्या स्त्रियांची कार्यक्षमता, सर्जनशीलता मारुन टाकण्यात केवळ स्त्रियांची हानी नसून संपूर्ण मानवजातीची हानी होत आहे. स्त्रियांची गुणवत्ता वाढलो तर पुरुषाला पर्यायाने समाजाला त्याचा फायदा होईल. मानवी हक्क, स्त्री-शुद्रांच्या जीवनात महात्मा फुल्यांनी प्रकाशाची पहिली ज्योत पेटविली. १८४८ मध्ये पूण्यात भांबुडी येथे मुलींसाठो पहिली शाळा व १८५१ साली जुना गंजपेठ येथे सर्व शुद्रांसाठी पहिली शाळा फुल्यांनी स्थापन केली. ज्योतीबांना गुरु मानणाऱ्या बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या उद्धाराची जबाबदारी स्वीकारली. उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९२० साली बाबासाहेब भारतात परतले. तेव्हा कामाठीपुरा, सातरस्ता, परळ येथील दगडी चाळ, लोखंडी चाळ, घोड्याच्या पागेतील अस्पृश्य वस्त्यांमधून लोकजागृतीसाठी ते भाषण करीत असत. स्त्रियांनीही त्यांच्या भाषणाचा लाभ घ्यावा. असे वाबासाहेबांना वाटत असे. आपल्या भगिणींनी शिकावे, उच्च वर्षीय स्त्रियांप्रमाणे दिसावे, वागावे, स्वाभिमानाने जगावे असे बाबासाहेब आपल्या भाषणातून सांगत असत. स्त्रियांच्या प्रगतीवरून ते त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करीत असत. विद्यार्थी दशेत असल्यापासूनच स्त्री शिक्षणाचा त्यांनी आग्रह धरला होता. औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन करुन त्यात त्यांनी मुलींना प्रवेश दिला. या महाविद्यालयात जास्त संख्येने मुलीना येता यावे म्हणून महाविद्यालय ते शहर अशी बससेवाही उपलब्ध करुन दिली. स्त्रियांच्या प्रगतीच्या आड त्यांची लवकर होणारी लग्ने येतात. हे बाबासाहेबांनी बरोबर हेरले होते. म्हणूनच लग्ने लवकर करुन वैवाहिक जीवन त्यांच्यावर लादू नका असे ते आबूर्जन सांगत.

**विद्यापीठीय शिक्षण :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठीय शिक्षणाला विशेष महत्व देतात. त्याकाळी विद्यापीठीय शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केलेत. मुंबई विद्यापीठ हे एकच विद्यापीठ त्यावेळी उच्च शिक्षणासाठी उपलब्ध होते. परंतू केवळ परीक्षा घेण्यापुरतेच ह्या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र होते. त्यामुळे परीक्षा घेतांना त्यात कडकपणा आणण्यावर विद्यापीठ अधिकाऱ्यांचा कटाक्ष होता. परंतू बाबासाहेबांच्या मते नुसत्या परीक्षा घेणे व त्या परीक्षा

पद्धतीत कडकपणा आणणे म्हणजे शैक्षणिक दर्जा सुधारणे नव्हे ! त्यांच्या मते, परीक्षा आणि शैक्षणिक दर्जा ही शिक्षणाची दोन किंवा अंगे आहेत. त्यात मागास समाजाचे अत्यंत नुकसान होत आहे. असे त्यांना वाटत असे. त्यांच्या मते, मागासवर्गीय विद्यार्थी सर्व पेपर्समध्ये एकाचवेळी पास होण्याची शक्यता नसते. कारण त्याची बरोबरी सर्व सोयी सुविधा असलेल्या सवर्ण अथवा उच्चवर्णीय विद्यार्थ्यांशी करताच येणार नाही. दुर्बल घटकातील व पददलित विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका ह्याचा पद्धतीचा उपयोग करुन आपली ज्ञानतृष्णा भागवावी लागेल आणि जीवनातील आवश्यक गरजा पूर्ण करण्याचा किंबहुना त्यांची जुजबीपणे पूर्ती करण्याचा प्रयत्न त्याचवेळी करता येईल. म्हणजेच दिवसा काबाडकष्ट करुन राहिलेल्या वेळात त्यांना शिक्षण घेता येईल. तेव्हा अशा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने विद्यापीठानेच प्रयत्न केलेले अधिक योग्य होईल. विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत द्यावी असेही बाबासाहेबांनी सुचविले होते. विद्यापीठीय शिक्षणाचा मुळ उद्देश संशोधन आणि उच्च शिक्षण हा असतो. ह्याबाबत त्याच्यावर अमेरिका व इंग्लंडमधील शिक्षणाचा प्रभाव पडलेला जाणवतो. मुंबई विद्यापीठ कायदा (बिल) जेव्हा मांडले गेले तेव्हा त्यांनी चर्चमध्ये सक्रिय भाग घेवून अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या मते, या विद्यापीठाची स्थापनाच एक परीक्षा घेणारी संस्था म्हणून झाली हा सवांत मोठा दोष या विद्यापीठाचा असेल त्यामुळे विद्यापीठास संशोधन आणि उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारता येणार नाही. जो विद्यापीठाचा मुळ उद्देश असतो. बाबासाहेबांनी विद्यापीठीय शिक्षणास सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी योग्य त्या सुचना केल्या. बाबासाहेबांनी विद्यापीठीय शिक्षणास सुशरणा करण्यासाठी वेळोवेळी योग्य त्या सूचना केल्याने डॉ. बाबासाहेबांनी उच्च शिक्षण हाच अश्यांच्या इनतीचा अंतिम पर्याय आहे, असे सांगीतले आहे. अस्पृश्यांची गुलामी उच्च शिक्षणानेच नष्ट होईल तसेच विकासले याच शिनि होईन, असरांच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च तिवारी आषध आहे असे त्यांनी आग्रहाने सांगीतले, शिक्षा शिक्षणाचा प्रयन असो को शिक्षणातील सवलतीचा प्रश्न असो या सर्व क ओक्रमात सरकार दक्ष असले पाहिजे, उच्च शिक्षण हो एकाच वर्गाची विरासत न बनता सर्वच वर्गात उच्च शिक्षणाचा प्रसारणका होईल. यासंबंधी दक्षता सरकारने घेणे आवश्यक आहे. हिन्दुस्थानचे प्रादेशिकता हे वैशिष्ट्य लक्षात घेवून डॉ. पावसार कामा सोडाशक विद्यापीठाची स्वायत्तता पुरुस्कृत केली. पण त्याचवेळी त्यांनी सर्व प्रांतातील शिक्षण समान पातळीवर व समान प्रमाणात आणले पाहिजे. ते हिन्दुस्थानच्या शिक्षणपद्धतीच्या दृष्टीने हितावह आहे असे आवर्जुन प्रतिपादन केले. त्यांनी लोकांना साक्षर करणे, निरक्षरता समूळ नष्ट करणे ह्या प्रांतिक सरकारच्या जबाबदाऱ्यांची जाणीवही करुन दिली. अस्पृश्य समाजाचे अज्ञान हे त्यांच्यावर स्पृश्य समाजाने लादले होते. त्यांच्या प्रगतीची आणि विकासाची दारे धर्मरुढीनी बंद केली होती. म्हणूनच शिक्षणाअभावी, अज्ञानापायी, अंधश्रद्धेमुळे, समाजबंधनामुळे अस्पृश्यांच्या पोटी जन्मलेल्या मुलाबाळांच्या जीवनाचे नुकसान आहे. शिक्षणापासून वंचित राहिलेला हा समाज सर्वच बाबींमध्ये दुबळा राहिला. त्यांचा उद्धार करण्याचे कार्य म. ज्योतीबा फुल्यांनी केले. डॉ. बाबासाहेबांनी फुले यांचे कार्य पुढे नेले. त्यांनी अस्पृश्यातील माणसाला 'माणूस' असल्याची जाणीव करुन दिली. त्यांना ज्ञानग्रहणासाठी ज्ञानाची भांडारे मोकळी करुन दिली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला आणि गुलामगिरी व अन्यायाविरुद्ध लढण्यास सिद्ध व सज्ज केले. बाबासाहेबांच्या मते, शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या बौद्धिक व मानसिक विकास करन आणणारे सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे आर्थिक विकास साधण्याचे व राजकिय स्वातंत्र्य मिळविण्याचे शस्त्र आहे. जर अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर आणि माणूस म्हणून जगायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा त्यांचा संदेश होता.

**संदर्भ ग्रंथ :**

१) बरडे डॉ. संजय : भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन, दिल्ली, संदेश प्रकाशन, २०१०.

२) घोरमोडे डॉ. के.यू. घोरमोडे डॉ. कला शैक्षणिक विचारवंत, नागपूर, विद्या प्रकाशन, २००६.

3) Kuber W.N.: Ambedkar- A Critical study,, New Delhi, People publishing house, १९९१.

4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, संपादक, पुंडलीक ना. पाटील गुरुजी, सुधीर प्रकाशन, वर्धा.

5) प्रभावशाली शिक्षणतज्ज्ञ, प्रा. शमसुधिन तांबोळी, प्रा. वेनझीर तांबोळी, २४ मे २००९, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

6) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर, तिसरे पुर्नमुद्रण- २००३, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

7) जागतिक शिक्षणतज्ज्ञ, डॉ. सौ. प्रतिभा सुधिर पेंडके, जानेवारी २०१०, विद्याप्रकाशन, नागपूर